झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्रमांक : ५७

क्रमांक : झोपुप्रा/मुकाअ/परि/सह.नो./सन २००३/८३
गृहनिर्माण भवन,५ वा माळा,
बांद्रा-पूर्व,मुंबई-४०० ०५१.
दिनांक : १५/१२/२००३

## परिपत्रक

विषय : झोपडपटटी पुनर्वसन योजनेतंर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीबाबत.

या कार्यालयाच्या दिनांक १८.९.२००३ चा (इंग्रजी) परिपत्रकीय सूचनेनुसार (C.C.) बांधकाम परवानगी मिळाल्यावर झोपडपटटी धारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदविण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

तथापि, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशी परवानगी मिळालेवर देखील मुख्य प्रवर्तक/विकासक सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी करण्यास टाळाटाळ करीत असतात.

या कार्यालयात प्राप्त तक्रारीचे स्वरूप पहाता उदा.पात्र झोपडीधारकांना संक्रमण शिबीरात पर्यायी संकुल उपलब्ध करून न देणे,पात्र असूनही सभासद करून न घेणे,लॉटरी पध्दतीने सदनिकांचे वाटप न करणे,हिशोबाची पत्रके उपलब्ध करून न देणे इत्यादि तक्रारी बाबतीत जर संस्था नोंदणी झालेली नसल्याने कायदेशिर कारवाई करणे या कार्यालयास शक्य हात नाही. सदरची अडचण विचारात घेता अभियांत्रिकी विभागास खालील सूचना देणे आवश्यक आहे -

१. नियोजित संस्थेच्या प्राथमिक बांधकामाविषयीच्या योजनेला उदा.एल.ओ.आय. ला मंजूरी देतांना त्या नियोजित संस्थेचे नांव आरक्षण करून बँकेत खाते उघडून घेणे आवश्यक आहे

२. ज्या संस्थांना बांधकामास परवानगी (C.C. upto plinth level) देण्यात आली आहे अशा नियोजित संस्थांनी एक महिन्यात संस्थेची नोंदणी करून घेणे मुख्य प्रवर्तकावर बंधनकारक राहील.

३. यापूर्वीच जर बांधकामास परवानगी दिली असेल तर त्यांना पुढील बांधकामाची परवानगी देतांना (C.C.above plinth level) संस्था नोंदणी करून घेणे बंधनकारक राहील. तसेच ज्या संस्थांना चौथ-याच्या पुढील बांधकामास परवानगी दिली असेल (C.C.above plinth level) अशा नियोजित संस्थांनी उपरोक्त परवानगी मिळाल्यानंतर १५ दिवसांत संस्थेची नोंदणी करून घ्यावी.

४. ज्या प्रकरणात वरील परवानग्या देण्यात आलेल्या आहेत अशा प्रकरणात नोंदणी झालेशिवाय (O.C.) इमारत वापराचा परवाना देण्यात येवू नये.

तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी जर म्हाडा किंवा इतर विभागात (वार्डात) झालेली असेल व त्या संस्थेने नंतर झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्विकारली असेल तर त्या संस्थेच्या बांधकामाविषयीच्या योजनेला मंजूरी देतांना उदा.एल.ओ.आय.,आय.ओ.डी. त्या सर्व संस्थांची नोंदणी केव्हा झाली व कोणत्या विभागात करण्यात आलेली आहे, सभासदांची यादी,परिशिष्ट-२ ची यादी संस्थेच्या पदाधिका-यांनी/विकासकाने सहकार कक्षास देणे सक्तीचे आहे. त्याशिवाय अंभियांत्रिकी विभागाने संबंधीत संस्थेच्या योजनेस मंजूरी देऊ नये.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झो.पु.प्राधिकरण,मुंबई.